जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :- ८ मार्च, २०२३

जळगाव दि.८ (प्रतिनिधी) प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, बाल संगोपन आणि नर्सिंग या तीन क्षेत्रांमध्ये महिलांचा वावर अधिक दिसत असतांनाही ही क्षेत्रे मात्र दुर्लक्षित असल्याची खंत कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी जागतिक महिला दिनी व्यक्त केली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात महिला दिनानिमित्त प्रा.माहेश्वरी यांनी शिक्षक व शिक्षकेतर महिलांसोबत बुधवारी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले की, एकाच वेळी अनेक भूमिका महिला निभावत असतात. विद्यापीठात काम करणाऱ्या महिलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतांना ते म्हणाले की, घर आणि कार्यालय या दोन्ही ठिकाणी या महिला अत्यंत ताकदीने आणि क्षमतेने काम करतात. आज शिक्षण क्षेत्रात मुलींचे प्रमाण वाढत आहे. ही चांगली बाब असली तरी अजूनही लिंगभाव समानता आपल्या समाजात आलेली नाही. त्यासाठी दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. प्रत्येक महिला ही आईची भूमिका अद्भूतपणे निभावत असते. यामध्ये प्रेम, करुणा, जबाबदारी, काळजी यांचा अंतर्भाव असतो. आपल्यातील कौशल्याचा पूर्ण वापर करुन महिला आपले स्थान निर्माण करत आहे असे त्यांनी सांगितले. प्रा.मधुलिका सोनवणे, प्रा. पवित्रा पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखा पाटील यांनी केले.

## बातमी क्र.२

जळगाव दि.८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या तीन क्रिकेट खेळाडूंची अखिल भारतीय आंतरविभागीय विद्यापीठ मर्यादित षटकांच्या स्पर्धेसाठी पश्चिम विभागाकडून निवड झाली आहे.

अखिल भारतीय विद्यापीठ संघाच्यावतीने वीझी ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले जाते. राजस्थान येथे पश्चिम विभागीय आंतर विभागीय विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या क्रिकेट संघाने तिसरे स्थान पटकाविले होते. या स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडूंची निवड केली जाते. शुभम शर्मा (सदगुरु शारीरिक शिक्षण महाविद्यालय, जळगाव), तनेश जैन व संकेत पांडे (मु.जे.महाविद्यालय,जळगाव) या तीन खेळाडूंची पश्चिम विभागीय क्रिकेट संघात निवड झाली आहे. १० ते १६ मार्च या दरम्यान रायपूर, छत्तीसगड येथे ही स्पर्धा होणार आहे. या तीन खेळाडूंच्या निवडीने विद्यापीठाचा लौकिक उंचावला आहे. अजित वाडेकर, सुनील गावस्कर, संजय मांजरेकर, बिशनसिंह बेदी यासारखे प्रसिध्द भारतीय क्रिकेटपटू वीझी ट्रॉफी खेळलेले आहेत. निवड झालेल्या खेळाडूंचा कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील उपस्थित होते.

## बातमी क्र.३

जळगाव दि.८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योग मार्गदर्शन केंद्रातर्फे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला व विद्यार्थिनींसाठी हसत-खेळत योगा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावर्षी “लैंगिक समानतेसाठी नविन उपक्रम व तंत्रज्ञान” ही महिला दिनाची थीम आहे. योगामूळे लैंगिक भेदभाव मिटवून समानता रुजविण्याच्या उद्देशाने “ योगा विथ फन : पेअर योगा ” या कार्यक्रमाचे

आयोजन करण्यात आले. वक्रासन, परीघासन, भूजंगासन, मलासन, ध्रुवासन, पर्वतासन आदी आसनांचे प्रशिक्षण देण्यात आले. बाबू जगजीवन राम वसतिगृहात झालेल्या या कार्यक्रमास सिनेट सदस्य तथा रेक्टर प्रा.किर्ती कमलजा, केंद्राचे प्रमुख इंजि.राजेश पाटील, सुनीता अहिरे उपस्थित होते. डॉ.लिना चौधरी व माधवी तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात ४७ महिला सहभागी झाल्या होत्या.

## बातमी क्र.४

जळगाव दि.८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रासायनिक तंत्रज्ञान संस्थेत बुधवार दि.८ मार्च पासून वार्षिक स्नेहसंमेलन – केमक्रूझ २३ ला प्रारंभ झाला. तीन दिवस हे संमेलन सुरु राहणार आहे.

रंगकर्मी मंजूषा भिडे यांच्या हस्ते या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले. प्रास्ताविक प्रा.जी.ए.उस्मानी यांनी केले. संयोजक म्हणून प्रा.विश्वराज तायडे, प्रा.अजय गोस्वामी, प्रा.राजकुमार शिरसाम हे काम पाहत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पलक करवतकर व मधुरा बोडखे या विद्यार्थिनींनी केले. संचालक प्रा.जे.बी.नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या या स्नेहसंमेलनात तांत्रिक तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी नृत्य, गायन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी